R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail : dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ६२

दि. १५ फेब्रुवारी २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## प्रत्येक नागरिकाचा विकास या कर्तव्यभावनेतून केंद्रीय अर्थसंकल्पाची मांडणी-माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर

लातूर/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशहित डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण करत असून पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देश विकासाच्या गतीने वाटचाल करीत आहे. स्वातत्र्यांच्या अमृत काळात विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने ठोस पाऊले उचलली जात असून त्याचे प्रतिबिंब केंद्रीय अर्थसंकल्पात पाहण्यास मिळत आहे. प्रत्येक नागरिकाचा विकास या कर्तव्य भावनेतूनच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्प मांडला असल्याचे माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारमध्ये कार्यरतअसलेल्या अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी नुकताच देशाचा अर्थसंकल्प मांडला आहे. या अर्थसंकल्पाबाबत विरोधी पक्षांकडून वेगवेगळी विधाने होवून सर्वसामान्य जनतेचा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगून आ. निलंगेकर म्हणाले की, या अर्थसंकल्पामुळे आर्थिक प्रगती, मुलभूत सुविधांना वेग या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेस साडेतीन पट अधिक बळ प्राप्त होत आहे. १४० कोटी देशवासियांच्या आशाअपेक्षा पूर्ण करणे देशातील सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योग तसेच उत्पादन क्षेत्रात गती देणे, रोजगार निर्मिती करणाजया क्षेत्रास प्रोत्साहन व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, पतहमी योजनेस प्रोत्साहन, विदेशी गुंतवणूकीतून रोजगार वाढविणे, विदेशी चलन निर्मीती, नवनवीन उर्जा निर्मितीस प्रोत्साहन अशा बहुउद्देशातून केंद्रीय अर्थसंकल्पाची मांडणी करण्यात आलेली आहे. या अर्थसंकल्पाद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतीची नवी वाटचाल सुरु असल्याचे स्पष्ट होते असे, आ. निलंगेकर यांनी सांगितले.

या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा तर मिळालीच आहेमात्र महाराष्ट्रालाही या गुंतवणूकीचा थेट लाभ मिळणार असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले. तीन नवे केमिकल पार्क, टेक्स्टाईल पार्क, विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करणारे प्रकल्प या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्राला मिळणार असल्यामुळे त्याचा मोठा फायदा होणार आहे. रेल्वे प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्राकरिता २४ हजार कोटीची तरतूद झाली आहे. ग्रोथ हबच्या रुपाने येत्या पाच वर्षात विकास साधला जाणार असून त्याकरिता प्रत्येक शहरासाठी ५ हजार कोटीची तरतूद करण्यात आलीआहे. मुंबई - पुणे व पुणे - हैदराबाद या हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरची योजना आखलेली असून याचा लातूरलाही लाभ होणार आहे.

या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासाला अधिक गती मिळून राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळण्यास मोठी मदत होणार असल्याचे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले.

विरोधकांना बोलण्यासारखे काहीच नसल्याने त्यांच्याकडून संभ्रम पसरविण्यात येत असल्याचे सांगून आ. निलंगेकर यांनी विरोधकांना आता अपप्रचार करणे व केंद्र सरकारवर टिका करणे हेच काम राहिलेले असून विरोधकांच्या या प्रत्यनाला जनता आता बळी पडणार नाही, असेही आ. निलंगेकर यांनी सांगितले.

## जिद्द, चिकाटी आणि स्वप्नांचा विजय - लातूरचा महादेव येमले बनला क्लास-१ अधिकारी!

लातूर : जिद्द आणि चिकाटी असेल, तर यश दूर नसते, या उक्तीला साजेसा प्रेरणादायी प्रवास करत हिप्परसोगा (ता. जि. लातूर) येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र महादेव काशीबाई विठ्ठलराव येमले यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) २०२४-२५ राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन करून क्लास-१ अधिकारी पद मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महादेव येमले यांचे प्राथमिक शिक्षण लातूर येथील ज्ञानेश्र्वर विद्यालयात झाले, तर माध्यमिक व पदवीचे शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालयात पूर्ण झाले. पुढे त्यांनी पुणे येथील गडझच् कॉलेजमधून चइ- केले. शासकीय सेवेत अधिकारी बनण्याच्या ध्यासाने त्यांनी चझडउच्या अभ्यासाला सुरुवात केली.

अत्यंत सर्वसाधारण आणि आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या महादेव यांनी कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय स्वतःच्या अभ्यासावर विश्र्वास ठेवून अथक परिश्रम केले. या संघर्षमय प्रवासात त्यांचे मामा तुळशीराम कोयले यांनी आर्थिक पाठबळ देत त्यांना खंबीर साथ दिली. अनेक वेळा मुख्य परीक्षा देऊनही अपेक्षित यश मिळाले नाही, मात्र त्यांनी हार न मानता अभ्यास सुरूच ठेवला.मधल्या काळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली लहान भाऊ अमोल येमले सहाय्यक नगर रचनाकार (-ढझ) झाले, तर मावस बहिण दिपाली मोरमपल्ले सहाय्यक राज्यकर आयुक्त (-उडढ) बनल्या. तरीही महादेव यांना यश मिळण्यास विलंब होत होता. अनेकांनी अभ्यास सोडण्याचा सल्ला दिला, पण मन के जीते जीत, मन के हारे हार या विश्र्वासावर त्यांनी संयमाने प्रयत्न सुरू ठेवले.अखेरीस त्यांच्या अथक मेहनतीचे फळ मिळाले आणि नुकत्याच जाहीर झालेल्या राज्यसेवेच्या निकालात चक्र-ड/उ-ऋज पदासाठी त्यांची क्लास-१ अधिकारी म्हणून निवड झाली.



कर्म केले त्याची फळ
वाया कोण देईल!
जे पेरावे ते उगवेल,
हे तत्व जाणावे!

महादेव येमले यांचा संघर्षमय प्रवास आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. सातत्य, संयम आणि ठाम निर्धार असेल, तर कठीण परिस्थितीतही मोठे यश मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

महादेव येमले म्हणाले :

आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करणे हीच माझ्यासाठी सर्वात मोठी गोष्ट आहे. या प्रवासात अनेकदा अपयश आले, पण कुटुंब आणि मित्रांनी दिलेल्या धीरामुळे मी उभा राहिलो. स्पर्धा परीक्षेत संयम आणि सातत्य टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मातोश्री काशीबाई येमले यांची भावना :त्याच्या प्रयत्नांना यश मिळाले, यातच आमचा आनंद आहे. मुलाचा आम्हाला खूप अभिमान वाटतो.

वडिलांचे मत :तो मोठा अधिकारी व्हावा, हे आमचं स्वप्न होतं. ते त्याने पूर्ण केलं. आमच्या कुटुंबाचं नाव उज्ज्वल केलं - यापेक्षा एका पित्याला आणखी काय हवं!महादेव येमले यांचा हा प्रेरणादायी प्रवास केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण युवकांसाठी जिद्द आणि ध्येयाने जगण्याचा संदेश देणारा ठरत आहे.

## डॉ.विश्र्वासराव आरोटे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर!

नागपुर। प्रतिनिधी:डारश्रश्र रपव चशवळीा छशुीरिशिीा -ीलळरींळेप (स्मॉल न्ड मिडीयम न्यूज पेपर असोशियन, सिंधुदुर्ग) यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय संपादक एकदिवसीय खुले अधिवेशनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक मा. डॉ. विश्र्वासराव आरोटे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील दीर्घकालीन, उल्लेखनीय व निष्ठापूर्ण योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.



पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्र्न, घडामोडी व लोकहिताचे विषय सत्य, निष्पक्ष आणि निःस्वार्थपणे मांडण्याचे कार्य डॉ. विश्र्वासराव आरोटे यांनी सातत्याने केले आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे, सामाजिक प्रश्र्नांना वाचा फोडणे तसेच जनजागृतीची प्रभावी भूमिका बजावणे या त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात जागरूकता निर्माण झाली असून नव्या पिढीतील पत्रकारांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.

हा सन्मान सोहळा शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी नगर भवन, हनुमान वॉर्ड, वरोरा, जि. चंद्रपूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास राज्यभरातील पत्रकार, संपादक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या निवडीबद्दल संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तमराव वाडकर, राष्ट्रीय सचिव ईश्र्वरसिंह सेंगर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष योगेश तुरेराव, राज्य अध्यक्ष संतोष धरमकर (महाराष्ट्र) तसेच राज्य सचिव आशिष घुमे (महाराष्ट्र) यांनी विश्र्वासराव आरोटे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## जनता दरबारच्या माध्यमातून जनतेची कामे निकाली काढणारे खंबीर नेतृत्व : वनमंत्री गणेश नाईक

नवी मुंबई / के. एच. हनवते : - विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई येथे राज्याचे वनमंत्री श्री. गणेशजी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित जनता दरबारात उपस्थित राहण्याचा योग आला.




जनसामान्यांचे प्रश्र्न केवळ ऐकून न घेता, ते जागेवरच निकाली लावण्याचा 'धडाका' आजही कायम असल्याचे पाहायला मिळाले.

प्रशासकीय दिरंगाईला चपराक लगावत आणि सामान्यांचे प्रश्र्न तातडीने सोडविण्याबाबत अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले.

कामं होणारच! हा शब्द आणि तो पूर्ण करण्याची त्यांची कडक भूमिका पुन्हा एकदा नवी मुंबईकरांनी जनता दरबारात अनुभवली. याप्रसंगी मा. खासदार डॉ. संजीवजी नाईक, महापालिका आयुक्त डॉ. कैलासजी शिंदे, नवी मुंबई महानगरपालिका महापौर : सुजाता ताई सुरज पाटील, उपमहापौर श्री. दशरथजी भगत तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## सांज. दैनिक बीड वास्तवच्या उपसंपादकपदी वसंत सोनवणे यांची निवड

केज/प्रतिनिधी-सांज. दैनिक बीड वास्तवच्या उपसंपादकपदी वसंत सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. दैनिक बीड वास्तवच्या उपसंपादकपदी वसंत सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.





सांज. दैनिक बीड वास्तवचे संपादक जितेंद्र शिरसाट यांनी पत्रकार वसंत सोनवणे यांच्या पत्रकारितेतील कार्याची दखल घेत त्यांना सांज.दैनिक बीड वास्तवच्या उपसंपादकपदी निवड केली आहे.

केज येथे पत्रकार बांधव व सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी पत्रकार वसंत सोनवणे यांचा हार शाल,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते रज्जाकभाई सय्यद,आर.पी. आय. (आंबेडकर) पक्षाचे तालुकाध्यक्ष अश्रुबा खरात, ज्येष्ठ पत्रकार दैनिक लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी महादेवराव काळे, दैनिक बीडसत्ता आंबेजोगाई तालुका प्रतिनिधी प्रशांत मस्के, दैनिक महावृत्तचे केज तालुका प्रतिनिधी तात्या गवळी, दैनिक बीडसत्ता केज तालुका प्रतिनिधी बाळासाहेब जाधव इत्यादी उपस्थित होते.




## संपादकीय...

### विरोधी पक्ष नेता असावा तर राहुल गांधींसारखा? – सातत्य, संघर्ष आणि संवादाचा राजकीय प्रवास

भारतीय राजकारणात नेतृत्वाची व्याख्या अनेकदा सत्तेच्या शिखरावर पोहोचण्यात मोजली जाते. परंतु खरे नेतृत्व केवळ पद, बहुमत किंवा प्रचारयंत्रणेच्या जोरावर घडत नाही; ते सातत्यपूर्ण संवाद, टीका सहन करण्याची क्षमता, जनतेत मिसळण्याची तयारी आणि विचारांवर ठाम राहण्याच्या वृत्तीमधून आकाराला येते. या संदर्भात ठरहींश्र ऋ्रपवहळ यांचा राजकीय प्रवास चर्चेचा विषय ठरतो.

टीकेतून घडलेले नेतृत्व

राहुल गांधी यांना गेल्या दशकभरात प्रखर टीकेला सामोरे जावे लागले. राजकीय विरोधकांकडून त्यांची खिल्ली उडवली गेली, त्यांची क्षमता आणि सातत्य यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. परंतु लोकशाहीत टीका ही अपरिहार्य असते. प्रश्न असा असतो की त्या टीकेला उत्तर कसे दिले जाते.

राहुल गांधी यांनी पराभवांनंतरही राजकारण सोडले नाही. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांतील पराभवानंतर त्यांनी संघटनात्मक पुनर्बांधणीवर भर दिला. पराभव मान्य करून पुढे जाण्याची वृत्ती ही नेतृत्वाची महत्त्वाची खूण आहे.

भारत जोडो यात्रा : संवादाचा प्रयोग

२०२२–२३ मध्ये काढण्यात आलेली 'भारत जोडो यात्रा' ही त्यांच्या राजकीय शैलीतील मोठी घटना ठरली. हजारो किलोमीटरचा पदप्रवास करून त्यांनी थेट जनतेशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, लघुउद्योजक अशा विविध घटकांशी प्रत्यक्ष भेटीगाठी घेऊन त्यांनी प्रश्न ऐकले.

आजच्या डिजिटल आणि आभासी प्रचारयुगात प्रत्यक्ष चालत जाऊन संवाद साधणे हा वेगळा प्रयोग मानला गेला. समर्थकांच्या मते, या यात्रेमुळे राहुल गांधींची प्रतिमा केवळ 'वारसदार' अशी न राहता 'संवादक' म्हणून उभी राहिली.

संसद आणि मुद्देसूद भूमिका

संसदेत त्यांनी बेरोजगारी, महागाई, सामाजिक सलोखा, संस्थांची स्वायत्तता, आर्थिक विषमता यांसारख्या मुद्द्यांवर सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या भाषणांमध्ये सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका दिसली, तर दुसरीकडे संविधान, लोकशाही संस्था आणि सामाजिक एकात्मतेचा आग्रहही दिसला.

विरोधी पक्षाच्या भूमिकेत असताना सरकारला जबाबदार धरणे ही संसदीय लोकशाहीची मूलभूत गरज आहे. त्या अर्थाने राहुल गांधी यांची भूमिका सत्तेच्या विरोधातील प्रभावी आवाज म्हणून अधोरेखित होते.

राजकीय वारसा आणि स्वतःची ओळख

राहुल गांधी हे खपवळीर ऋ्रपवहळ, ठरक्षळीं ऋ्रपवहळ आणि डेपळर ऋ्रपवहळ यांच्या राजकीय वारशाचे प्रतिनिधी आहेत. हा वारसा त्यांना संधी देतो, पण त्याच वेळी अपेक्षांचे ओझेही वाढवतो.

राजकीय वारशामुळे मिळालेली ओळख आणि स्वतःची वेगळी राजकीय ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न–या दोन्हींच्या संतुलनात त्यांचा प्रवास सुरू आहे. नेतृत्वाची खरी कसोटी ही स्वतःची स्वतंत्र भूमिका निर्माण करण्यात असते.

विचारधारा आणि स्पष्ट भूमिका

राहुल गांधी सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि संविधानिक मूल्यांवर ठाम भूमिका घेताना दिसतात. त्यांनी आर्थिक विषमतेवर टीका करताना 'क्रोनी कॅपिटलिझम'चा मुद्दा उपस्थित केला. मोठ्या उद्योगसमूहांना मिळणाऱ्या सवलती आणि सामान्य नागरिकांच्या अडचणी यातील तफावत त्यांनी वारंवार मांडली.

राजकीय मतभेद असू शकतात, पण स्पष्ट विचारधारात्मक भूमिका ही नेतृत्वासाठी आवश्यक असते. अस्पष्टता जनतेत संभ्रम निर्माण करते; स्पष्टता मतभेद निर्माण करू शकते, पण ती विश्र्वासार्हता वाढवते.

टीकाकारांची मते

न्याय्य दृष्टीकोनातून पाहिले, तर त्यांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करणारे मुद्देही आहेत. संघटनात्मक पातळीवर काँग्रेसची घटती ताकद, अनेक राज्यांतील पराभव, पक्षातील अंतर्गत मतभेद–हे वास्तव आहे. केवळ नैतिक किंवा वैचारिक भूमिका पुरेशी नसते; ती निवडणूक विजयात रूपांतरित करणे हीदेखील नेतृत्वाची कसोटी असते.म्हणूनच नेता असावा तर राहुल गांधींसारखा ही भूमिका समर्थकांसाठी प्रेरणादायी असली, तरी टीकाकारांसाठी ती अपुरी वाटू शकते. लोकशाहीमध्ये या दोन्ही मतांना स्थान आहे.

नेतृत्वाची व्यापक व्याख्या

नेतृत्व म्हणजे केवळ सत्तेचा वापर नव्हे, तर प्रश्न विचारण्याचे धैर्य, पराभवातून उभे राहण्याची जिद्द आणि जनतेशी सातत्याने संवाद ठेवण्याची तयारी. राहुल गांधी यांच्या राजकीय प्रवासात या घटकांचे दर्शन घडते.

ते अजूनही एका प्रक्रियेतून जात आहेत–पक्षपुनरुज्जीवन, व्यापक विरोधी आघाडीची उभारणी आणि पर्यायी धोरणात्मक दृष्टीकोन मांडण्याच्या प्रयत्नातून. अंतिम मूल्यांकन इतिहासच करेल; परंतु सध्याच्या राजकीय परिदृश्यात त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, हे नाकारता येणार नाही.

निष्कर्ष


नेता असावा तर राहुल गांधींसारखा हा घोषवाक्यात्मक विचार असू शकतो, परंतु त्यामागील मुद्दा अधिक महत्त्वाचा आहे–नेतृत्वाने संवाद साधला पाहिजे, टीका सहन केली पाहिजे आणि मूल्यांवर ठाम राहिले पाहिजे.

भारतीय लोकशाही बहुपक्षीय आहे. विविध विचारधारांचा संघर्ष आणि संवाद यांतूनच ती मजबूत होते. राहुल गांधी यांचा प्रवास हा त्या संघर्षाचा एक भाग आहे. ते कितपत यशस्वी ठरतील, हे भविष्यातील जनादेश ठरवेल; परंतु सत्तेच्या पलीकडे जाऊन प्रश्न विचारण्याची त्यांची तयारी ही नेतृत्वाच्या चर्चेत महत्त्वाची ठरते.

# एपस्टीन फाईल्स : सत्तेच्या सावल्यांतील सत्याचा शोध

जगात लोकशाही, मानवी हक्क आणि न्यायव्यवस्थेच्या उच्च मूल्यांबद्दल मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; परंतु काही प्रकरणे अशी असतात की ती या सर्व मूल्यांच्या पायावरच प्रश्नचिन्ह उभे करतात. एपस्टीन फाईल्स हे असेच एक प्रकरण आहे, जे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपुरते मर्यादित नसून, सत्ता, पैसा, प्रभाव आणि गुप्त संगनमत यांच्या गुंतागुंतीच्या जाळ्याकडे बोट दाखवते. हे प्रकरण आपल्याला विचारायला भाग पाडते की कायद्यापुढे सर्व समान आहेत का, की काहींचे हात इतके लांब असतात की ते न्यायालाही वाकवू शकतात? जेफ्री एपस्टीन हा अमेरिकन वित्तव्यवसायिक म्हणून ओळखला जात असला तरी त्याचे नाव जगभरात अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे कुप्रसिद्ध झाले. त्याच्या संपर्कात अनेक प्रभावशाली राजकारणी, उद्योगपती, सेलिब्रिटी आणि सत्ताधारी मंडळी असल्याचे आरोप आणि दस्तऐवज समोर आले. त्याच्या खाजगी विमान प्रवासाच्या नोंदी, भेटीगाठींचे रेकॉर्ड, न्यायालयीन कागदपत्रे आणि साक्षीदारांचे जबाब, या सर्वांचा एकत्रित उल्लेख म्हणजेच एपस्टीन फाईल्स. हे प्रकरण केवळ एका गुन्हेगाराच्या कृत्यांवर पडदा टाकत नाही, तर एक मोठा प्रश्न विचारते, सत्ताधाऱ्यांच्या वर्तुळात प्रवेश मिळाला की कायद्याचे दात बोथट होतात का?

एपस्टीन प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे त्याने अनेक वर्षे संशयाच्या भोवऱ्यात राहूनही प्रभावशाली संबंधांच्या जोरावर स्वतःला वाचवले. गंभीर आरोप असूनही त्याच्यावर कारवाई उशिरा झाली, शिक्षा सौम्य झाली आणि तपासात अनेक पोकळ्या राहिल्या. यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. जेव्हा फाईल्समधून मोठमोठी नावे पुढे येऊ लागली, तेव्हा जगभरात खळबळ उडाली. समाजाने असा प्रश्न विचारला जर सामान्य व्यक्ती असती, तर न्यायप्रक्रिया इतकी संथ राहिली असती का? की तिला आधीच कठोर शिक्षा झाली असती? या प्रकरणात माध्यमांची भूमिका देखील तपासली गेली. काही पत्रकारांनी जीवाची बाजी लावून तपास पत्रकारिता केली, पीडितांचे आवाज पुढे आणले आणि बंद दरवाज्यांमागचे व्यवहार उघड केले. परंतु त्याचवेळी काही माध्यमसंस्थांवर आरोप झाले की त्यांनी प्रभावशाली लोकांच्या दबावामुळे बातम्या दाबून ठेवल्या.




पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. जर हा स्तंभच दबावाखाली वाकला, तर सत्याचा आवाज कुठे ऐकू येणार? एपस्टीन फाईल्सने माध्यमविश्र्वालाही आत्मपरीक्षण करायला भाग पाडले आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि संवेदनशील भाग म्हणजे पीडित मुली व महिला. अनेकांनी वर्षानुवर्षे भीती, दबाव आणि सामाजिक कलंक सहन करत आपले अनुभव मांडले. त्यांचे म्हणणे होते, गुन्हा फक्त एका व्यक्तीने केला नाही, तर एक संपूर्ण व्यवस्था त्याला संरक्षण देत होती. न्यायालयीन प्रक्रियेत नावं, तारखा, ठिकाणं चर्चेत येतात; पण त्या मागे असतात तुटलेल्या आयुष्यांच्या कथा. एपस्टीन फाईल्स हे केवळ दस्तऐवज नाहीत, त्या असंख्य वेदनांच्या साक्षी आहेत. न्याय म्हणजे केवळ शिक्षा नव्हे; तर पीडितांचा सन्मान, पुनर्वसन आणि सत्याची अधिकृत कबुलीही आहे.

या प्रकरणाने एक भीषण वास्तव दाखवले सत्ता, पैसा आणि संपर्क यांचे जाळे इतके घट्ट असू शकते की ते कायद्यालाही गोंधळात टाकू शकते. जेव्हा उच्चभ्रू वर्तुळात गुन्हे लपवले जातात, तेव्हा लोकशाही कमकुवत होते. कारण लोकशाहीचा पाया आहे पारदर्शकता आणि उत्तरदायित्व. एपस्टीन फाईल्स हा जगातील सर्व लोकशाही व्यवस्थांसाठी एक इशारा आहे. कायद्याची पकड सर्वांवर समान असली पाहिजे. अन्यथा कायदा सर्वांसाठी समान हे वाक्य फक्त घोषवाक्य राहते. या प्रकरणाभोवती अनेक षड्यंत्र सिद्धांतही फिरतात. गुप्त नेटवर्क, राजकीय सौदे, रहस्यमय मृत्यू, दडपलेले पुरावे. सोशल मीडियाच्या युगात अफवा आणि तथ्य यांची सरमिसळ वेगाने होते. त्यामुळे जबाबदार तपास, अधिकृत कागदपत्रे आणि न्यायालयीन निष्कर्ष यांना अधिक महत्त्व प्राप्त होते.

समाजाने अंधविश्र्वास आणि अफवांपासून दूर राहून पुराव्यावर आधारित चर्चा करणे आवश्यक आहे. अन्यथा सत्याचा शोध गोंधळात हरवतो. एपस्टीन फाईल्स हे अमेरिकेतील प्रकरण असले तरी त्यातील धडे सार्वत्रिक आहेत. कोणत्याही देशात, कोणत्याही व्यवस्थेत जर प्रभावशाली लोकांना कायद्यापेक्षा वर मानले गेले, तर सामान्य नागरिकांचा न्यायावरील विश्र्वास डळमळतो. भारतातही अनेकदा प्रभाव, पैसा आणि राजकीय पाठबळामुळे तपासाच्या दिशांवर प्रश्न उपस्थित होतात. म्हणूनच तपास यंत्रणांची स्वायत्तता, न्यायव्यवस्थेची पारदर्शकता आणि माध्यमांची निर्भयता, हे तीन स्तंभ मजबूत ठेवणे अत्यावश्यक आहे.

एपस्टीन फाईल्समधील सर्व सत्य कधी पूर्णपणे बाहेर येईल का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. काही कागदपत्रे सार्वजनिक झाली, काही नावे समोर आली; परंतु अनेक धागे अजूनही अंधारात असल्याची भावना कायम आहे. न्याय केवळ न्यायालयीन निर्णयाने पूर्ण होत नाही; तो समाजाच्या विश्र्वासातून पूर्ण होतो. सत्तेच्या सावल्यांत लपलेले सत्य बाहेर आणण्यासाठी धैर्यवान पत्रकार, प्रामाणिक तपास अधिकारी, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि जागरूक समाज, या चौघांची गरज असते. एपस्टीन फाईल्सने जगाला धक्का दिला आहे; आता हा धक्का जागृतीत बदलणे आपल्याच हातात आहे. कारण शेवटी, लोकशाही टिकते ती घोषणांनी नव्हे तर निर्भय सत्यशोधाने.

# शिवाची महान रात्र म्हणजेच महाशिवरात्री

महाशिवरात्री म्हणजे शिवाची महान रात्र हा भारतीय आध्यात्मिक संस्कृतीमधील एक महत्वाचा सोहळा आहे. भारतीय संस्कृतीत एके काळी वर्षभरात ३६५ सण साजरे केले जात असत. दुस–या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांना वर्षातील प्रत्येक दिवस साजरा करण्यासाठी काही ना काहीतरी कारण हवे असायचे. हे ३६५ सण विविध कारणांसाठी आणि जीवनातील विविध उद्देश डोळ्यासमोर ठेऊन साजरे केले जात होते. विविध ऐतिहासिक घटना, विजय किंवा जीवनातील विशिष्ट परिस्थिती. उदा. पेरणी, लावणी आणि कापणी यासाठी ते साजरे केले जात होते. प्रत्येक परिस्थितीसाठी एक उत्सव होता. परंतु महाशिवरात्रीचे महत्त्व वेगळेच आहे.

प्रत्येक चंद्र महिन्यातील १४ वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभरात येणा–या १२ शिवरात्रींपैकी फेब्रुवारी–मार्च मध्ये येणा–या महाशिवरात्रीला सर्वात अधिक आध्यात्मिक महत्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशाप्रकारे असते की मानवामध्ये नैसर्गिकरित्या ऊर्जेचे एक उधाण निर्माण होते. हा असा दिवस असतो जेव्हा निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखराकडे ढकलत असतो. याचाच वापर करून घेण्यासाठी या संस्कृतीमध्ये आपण एक विशिष्ट सण स्थापित केला आहे, जो रात्रभर चालतो. या नैसर्गिक ऊर्जेची वाढ होऊ देण्यासाठी, रात्रभर चालणा–या या उत्सवाचा एक मूलभूत उद्देश म्हणजे आपण रात्रभर आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता जागे राहणे.

जे लोक अध्यात्मिक मार्गावर आहेत, त्यांच्यासाठी महाशिवरात्र अतिशय महत्त्वाची आहे. कौटुंबिक व्यक्ती तसेच जगातील महत्वाकांक्षी लोकांसाठी देखील ती अतिशय महत्त्वाची आहे. कुटुंबात रममाण होणारे व्यक्ती हा दिवस शिवाच्या विवाहाचा उत्सव म्हणून साजरा करतात. जी लोकं अतिशय महत्वाकांक्षी आहेत ते हा दिवस शिवाने त्याच्या सर्व शत्रुंवर मात करून विजय मिळविल्याचा दिवस म्हणून साजरा करतात.

पण संन्यासी अर्थात योगी लोकांसाठी शिव कैलास पर्वतासोबत एकरुप झाल्याचा दिवस आहे. तो पर्वतासारखाच पूर्णपणे अचल म्हणजेच स्थिर झाला. यौगिक परंपरेत शिवाला देव म्हणून पूजले जात नाही तर त्यांना आदिगुरु म्हणजे ज्यांच्यापासून योगशास्त्राची उत्पत्ती झाली ते प्रथम गुरु असे मानले जाते, अनेक सहस्त्र वर्षे ध्यानावस्थेत राहिल्यानंतर एक दिवशी ते पूर्णपणे निश्र्चल म्हणजे स्थिर बनले, तो दिवस म्हणजे महाशिवरात्री. त्यांच्या सर्व हालचाली थांबल्या आणि तो पूर्णपणे अचल झाला, म्हणून संन्यासी लोक महाशिवरात्रीला निश्र्चलतेची अर्थात स्थैर्याची रात्र मानतात.

महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व पौराणिक कथांव्यतिरिक्त योग परंपरेमध्ये या दिवसाला आणि रात्रीला इतके महत्त्व दिले जाते. याचे कारण ही रात्र साधकाला उच्च अध्यात्मिक शक्यता उपलब्ध करून देते. आधुनिक विज्ञान अनेक टप्प्यांतून गेले आहे आणि आज अशा टप्प्यावर पोहोचले आहे की जिथे ते आपल्याला हे सिद्ध करून दाखवायला तयार आहे की आपल्याला जीवन म्हणून माहित असलेली प्रत्येक गोष्ट, आपल्याला भौतिक पदार्थ आणि अस्तित्व म्हणून माहित असलेली प्रत्येक गोष्ट, आपल्याला ब्रह्मांड आणि आकाशगंगा म्हणून माहित असलेली प्रत्येक गोष्ट फक्त एकच ऊर्जा आहे जी लाखो वेगवेगळ्या मार्गांनी प्रकट होते.

समजुती बाजूला ठेवून दिल्या तरीसुद्धा योग परंपरेत हा दिवस आणि रात्र महत्त्वाची मानली जाते. याचे कारण हा दिवस अध्यात्माची ओढ असणा–या व्यक्तींना प्रचंड संधी उपलब्ध करून देतो. आधुनिक विज्ञान अनेक टप्प्यांमधून पुढे गेलेले आहे आणि आज या निष्कर्षापर्यंत पोहोचलेले आहे की ज्याला आपण जीवन असे म्हणतो. आपल्या अस्तित्वाबद्दल माहिती असणारी प्रत्येक गोष्ट, आपल्याला विश्र्व आणि आकाशगंगा म्हणून माहिती असणारी गोष्ट या सर्व गोष्टी एकच आहेत आणि त्या लक्षावधी मार्गांनी प्रकाशित होतात हे आज सिद्ध झालेले आहे.


प्रत्येक योगीमध्ये हे वैज्ञानिक सत्य म्हणजे अनुभवात्मक सत्यता आहे. योगी या शब्दाचा अर्थ ज्याला या एकरूपतेचा साक्षात्कार झालेला आहे अशी व्यक्ती. अथांगतेची माहिती करून घेण्यासाठी उत्सुक असणे, अस्तित्वातील ऐक्य जाणून घेण्याची उत्सुकता म्हणजे योग. याचा अनुभव घेण्याची संधी महाशिवरात्रीची रात्र आपल्याला उपलब्ध करून देते.

भारतीय संस्कृतीमध्ये कुठल्याही प्राचीन प्रार्थना स्वतःचे संरक्षण करण्याबद्दल किंवा जीवन चांगले घडवण्याबद्दल नव्हत्या. सर्व प्राचीन प्रार्थना नेहमीच हे प्रभू, मला नष्ट कर म्हणजे मी तुझ्यासारखा होऊ शकेन अशा होत्या. म्हणून शिवरात्री जी महिन्यातली सर्वात काळोखी रात्र आहे, ती प्रत्येक मानवासाठी त्याच्या मर्यादांच्या पलीकडे जाण्याची, सृष्टीच्या उगमाची अमर्यादता अनुभवण्याची संधी आहे, जी प्रत्येक मानवामध्ये बीजरुपात उपस्थित असते.

महाशिवरात्री ही एक संधी आणि शक्यता आहे. ती विशाल शून्यता अनुभवण्याची जी प्रत्येक मानवाच्या आत आहे, जी सर्व सृष्टीचा स्रोत आहे. एकीकडे शिव संहारक म्हणून ओळखला जातो. तर दुसरीकडे तो सर्वात कृपाळू म्हणून ओळखला जातो. तो सर्वात श्रेष्ठ दाता म्हणूनही ओळखला जातो. योग पुराणात शिवाच्या कृपाळू स्वभावाबद्दल अनेक कथा आहेत. त्याचा कृपाळूपणा व्यक्त करण्याची पद्धत अद्भुत आणि त्याचवेळी विचित्र आहे. त्यामुळे महाशिवरात्र ही कृपा ग्रहण करण्यासाठी एक खास रात्र आहे. ही शून्यतेची जिला आपण शिव म्हणतो, तिची विशालतेची आपल्याला एका क्षणासाठी तरी जाणीव व्हावी. ही रात्र आपल्यासाठी फक्त जागरणाची रात्र नाही, तर जागृतीची रात्र होवोत हीच सदिच्छा..!

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# बुद्धांच्या नावाने बौद्ध राष्ट्रांची लुटमार थांबलीच पाहिजे..!



बुद्धांच्या नावाने बौद्ध राष्ट्रांची लुटमार चालू आहे ती थांबलीच पाहिजे..! विदेशातील लोक गौत्तम बुद्धावर एवढं प्रेम करतात की, बुद्धांसाठी अमाप पैसा दान करण्यासाठी तयार असतात. आठ वर्षांपूर्वी मोदी पण जपानच्या दौऱ्यावर गेले होते त्यावेळेस बुद्धम् शरणम् गच्छामी बोलून जपान सरकारकडून बुलेट ट्रेनसाठी मात्र एक रुपया व्याज दराने ८०००० करोड घेऊन आले होते. त्यानंतर देवेंद्र फडणवीस पण जापान दौऱ्यावर गेले होते. त्यांनी पण जपान कडून. बरेच काही घेऊन आले आहेत. आणि भारतात मात्र या नेत्यांचा 'गौत्तम बुद्धांचा विसर पडतो आणि बौद्ध समाजाचा द्वेष केल्या जातो, महाबोधी महाविहार अजून पर्यंत ब्राह्मणांच्या ताब्यात आहे ते ताबा सोडायला तयार नाहीत. कारण महाबोधि महाविहाराला विदेशातून अमाप निधी दिला जातो, निधी जमा होतो आणि तो हडप करण्यासाठी ब्राह्मण त्या ठिकाणी सापासारखी कुंडली मारून बसली आहेत. हे आता कुठेतरी थांबले पाहिजे आणि म्हणून महाबोधी महाविहार ब्राह्मण मुक्त करा बीटी अँक्ट रद्द करा..! हे आंदोलन गेल्या एक वर्षापासून भारत वर्षभर चालू आहे, त्याचे प्रडसाद अता आंतरराष्ट्रीय स्थरावर पोहोचलेले आहेत. तरीपण मोदी सरकार 'गया येथील महाबोधी महाविहार' बौद्धांच्या ताब्यात द्यायला तयार नाही, अशा या ढोंगी सरकारचं पितळ उघडं पडलं आहे अता हे आंदोलन आंतरराष्ट्रीय स्तरावरती पोहोचलेलं आहे. येथील राज्यकर्त्यांनी वेळीच सावधानता बाळगावी आणि बिहार गया येथील 'महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात निलेश पाहिजे..!

**- कल्याणराव हनवते (वंचित)**

# शिक्षण महर्षी 'स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त' आंतरशालेय रंगभरण स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड/प्रतिनिधीशहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संस्थेचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धे चे शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत बीड शहरातील यशवंत विद्यालय व शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय या केंद्रांवर मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली कलात्मकता सादर केली.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आणि यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षण क्षेत्रात संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंती निमित्ताने आंतर शालेय रंगभरन स्पर्धा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. बीड शहरातील यशवंत विद्यालयात झालेल्या स्पर्धेत बीड शहरातील १९ शाळांनी सहभाग नोंदवला. तसेच ३२५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव वाघ यांच्या कार्याची आठवण जागवण्यात आली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संबंधित केंद्रांवर करण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आज रविवार रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीगचा फायनल सामना पाहण्यासाठी उपस्थित राहावे-लखन हजारे



केज/प्रतिनिधी-केज शहरातील स्व.अजित दादा पवार क्रिकेट मैदानावर आज रविवार रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीगच्या फायनल सामना पाहण्यासाठी केज शहरासह तालुक्यातील व परिसरातील क्रिकेट प्रेमी,युवक, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रियमीयर लिगचे चेअरमन लखन हजारे यांनी केले आहे.

गुरुवार दिनांक ५/२/२०२६ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीग एपीएलचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. हारुणभाई इनामदार,केज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे,केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड, माजी सभापती विष्णू घुले, युवा नेते तथा प्राचार्य राहुल भैय्या गदळे, सरपंच अमोल डोईफोडे, नगरसेवक अरुण आण्णा गुंड, नगरसेवक ओम रांजणकर, नगरसेवक युनुस शेख,सागर डिकुळे,कलीम सय्यद यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात करण्यात आली होती.

गेल्या ९ दिवसांपासून क्रिकेट स्पर्धा चालू होत्या या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी होते. आज रविवार रोजी फायनल सामन्यामध्ये दोन संघ सहभागी राहणार आहेत.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लीगचे२०२५-२६ यावर्षीचे चौथे पर्व आहे. आज रविवार रोजी होणाऱ्या फायनल सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी डीजे ची व्यवस्था केली आहे, मान्यवरांसाठी स्वतंत्र स्टेज,बैठक व्यवस्था, प्रेक्षकांसाठी मनोरंजनासाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीगचे चेअरमन लखन हजारे, व्हाईस चेअरमन मुन्ना शिंदे व त्यांचे सर्व सहकार्याने एपीएल मॅचेस चे आयोजन केलेले आहे. हा सामना सामाजिक, राजकीय, क्रीडा, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे तरी केज शहरासह तालुक्यातील व परिसरातील क्रिकेट प्रेमी, युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने आजरोजी होणाऱ्या फायनल सामना पाहण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन चेअरमन लखन हजारे यांनी केले आहे

# ज्ञानप्रबोधिनी शाळेतील आनंद नगरीस विद्यार्थी पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



केज/प्रतिनिधी-केज शहरातील महात्मा फुलेनगर भागातील अजिंक्यतारा संस्थेअंतर्गत ज्ञानप्रबोधिनी प्राथमिक विद्या मंदिर शाळेत बाल आनंद मेळावा म्हणजेच आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध प्रकारचे ३० स्टॉल उभारले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन नालंदा विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदकुमार मस्के यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

यावेळी विलास भिसे यांची उपस्थिती होती.तर या आनंद नगरीस केजच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, राजर्षी शाहू शाळेच्या मुख्याध्यापिका बी.बी.चाटे,जय भवानी शाळेच्या मुख्याध्यापिका जगताप मॅडम यांच्यासह अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन बालकांचा उत्साह वाढविला. विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत व्यवहारीक ज्ञान मिळणे देखील गरजेचे असते. यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातुन दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते याचा अनुभव यावा म्हणून आनंद नगरीचे आयोजन केल्याचे शाळेचे मुख्याध्यापक दयानंद देशमुख म्हणाले.

आनंद नगरीत बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शाळेकडून यावेळी विद्यार्थ्यांना टेबलची व्यवस्था करून दिली होती यावर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ बनवून विक्रीसाठी मांडले होते.

अतिशय नियोजनबद्ध आयोजित कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक तसेच शाळेचे हितचिंतक मित्रपरिवार उपस्थित होते. आनंद नगरीमधून विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री कशी होते हे समजून आले तसेच स्वकष्टांतून कमाईचे महत्त्व समजले. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांचा पालक व मित्रपरिवाराने आस्वाद घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक दयानंद देशमुख, शिक्षक जी.बी. लहाणे,एस. व्ही.जाधव,ए. बी.चाळक,ए. यू.थोरात,शिक्षिका एस.एम. कुलकर्णी,यु.जी. बडे, समुद्रे मॅडम व साळवे मॅडम यांनी मेहनत घेतली. शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी आनंद नगरीचा आनंद लुटला. या आनंदनगरीला विद्यार्थी पालक आणि मित्रपरिवारांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

# समाजभूषण उत्तमराव तरकसे यांचा भारत बांगलादेशाच्या सीमा भागात दौरा



बांगलादेश / ढाका :- बांगलादेशाची राजधानी ढाका येथे समाजभूषण उत्तमराव दासू तरकसे (महाराष्ट्र राज्य शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत) हे अत्यंत महत्त्वाचा व ज्वलंत विषयाच्या अवलोकनाकरिता म्हणजेच भारत-बांगलादेशाच्या दोन्ही देशाच्या सीमा भागातून बांगलादेशीय नागरिकांचे भारतात होणारी घुसखोरीच्या समस्या बाबतचा अभ्यासाचे अवलोकन करण्याकरिता भारताच्या पश्चिम बंगाल राज्यातील दक्षिण २४ परगाना सीमा, उत्तर २४ परगाना सीमा, कृष्णानगर, नदिया, मुर्शिदाबाद, बालुरघाट, उत्तर दिनाजपुर, जलपानगुडी, कुच, बिहार ह्या जिल्ह्यातील सीमा बांगलादेशाला लागून आहेततसेच मेघालय राज्यातील दक्षिण पश्चिम गारो हिल्स, दक्षिण गारो हिल्स, दक्षिण पश्चिम खासी हिल्स, पूर्व खासी हिल्स, पूर्व जयन्तिया हिल्स व आसाम त्रिपुरा राज्याच्या काही जिल्ह्यांच्या सीमा भाग बांगलादेशाला लागून असलेल्या काही जिल्ह्यातील सीमा भागातून बांगलादेशातील नागरिकांचे भारत देशात विना (पासपोर्ट) विनापरवाना घुसखोरीच्या मार्गाने या सीमा भागातून नागरिकांची खूप मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असते सर्वात जास्त बांगलादेशातील नागरिकांची भारत देशात पश्चिम बंगालमधील सीमा भागातून होते त्याचे अवलोकन करण्याकरिता समाजभूषण उत्तमराव तरकसे हे भारताच्या बांगलादेशातील सीमा लगत असलेल्या बांगलादेशाच्या राजधानी ढाका येथून सदर विषयाच्या अवलोकनाला सुरुवात करून बांगलादेशातील राजशाही विभाग, रंगपुर विभाग, सुलोना विभागातील नागरिकांना तसेच सीमेवरील जवानांना भेटून भारतात होणाऱ्या नागरी घुसकरीचा व बांगलादेशाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शेती विषयाचे अवलोकन करण्याकरिता समाजभूषण उत्तम तरकसे यांच्यासोबत सुनील मोहिते, राहुल भदाणे, प्रदीप गवस, राजु यादव, प्रदिप सणस त्यांचे मित्र परिवारांना सोबत घेऊन दहा दिवसाच्या सदर भागातील रहिवासी असलेले नागरिक अहमद पीर खान, साहिद जावेद, बिस्मिल्ला शेख, अशा नागरिकांना सोबत घेऊन सदर विषयाचे सखोल अवलंबन करून पश्चिम बंगाल मध्ये कोलकत्ता येथे येऊन तेथील हवाई अड्ड्यावरून विमानाने मुंबई आंतरराष्ट्रीय हवाई अड्ड्यावर त्यांच्या मित्र परिवारासह परतले.

# निवळी पं. स. गणात काँग्रेसचे अमोल देडेंच्या विजयासाठी परिश्रम घेणाऱ्या पांडुरंग देडे यांचा सत्कार



लातूर : लातूर तालुक्यातील निवळी पं. स. गणात काँग्रेसचे निवडून आलेले उमेदवार अमोल देडे यांच्या विजयासाठी परिश्रम घेणारे पांडुरंग देडे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

निवळी मतदार संघात काँग्रेसला जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणामध्ये मतदान करावे म्हणून पांडुरंग देडे यांनी व्हाईस चेअरमन विजयराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावात जाऊन प्रचार केला जिल्हा परिषद आदमाने व पंचायत गणामध्ये अमोल देडे यांच्यासाठी सहकार्य केल्याबद्दल भगीरथ देशमुख चेअरमन सोसायटी रामेगाव,पांडुरंग देशमुख सरपंच गोंदेगाव सुनील देशमुख तालुका अध्यक्ष गोंदेगाव पद्माकर जाधव यांनी लातूरमध्ये येऊन पांडुरंग देडे यांचा सत्कार केला.

# सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख यांचे शुभहस्ते रेणा साखर कारखान्याचे ४,२१,१११ व्या साखर पोत्याचे पुजन संपन्न

दिलीपनगर निवाडा :- रेणा सहकारी साखर कारखान्यातील गळीत हंगाम २०२५-२६ मधील उत्पादीत ४,२१,१११ व्या साखर पोत्याचे पुजन कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी माजी मंत्री मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर देशमुख, व्हा. चेअरमन श्री. ड. प्रवीण पाटील व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले.



सदर कार्यक्रमामध्ये कारखान्याचे कर्मचारी यांनी ८७ दिवसात उत्तम गाळप केले असल्याने कारखान्यातील कर्मचारी यांना १० % पगार वाढ करत असल्याचे कारखान्याचे संस्थापक सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी यावेळी जाहीर केले.

कारखान्याने चालु गळीत हंगामाचे गाळप दि. १८/११/२०२५ रोजी चालु झाले असुन कारखान्याने दि. १२/०२/२०२६ अखेर ८७ दिवसात कार्यक्षमतेचा पुरेपुर वापर करुन ४,०७,७७५ मे.टन गाळप करुन बी हेवी मोलसेस व सिरप इथेनॉलसह सरासरी ११.९३% साखर उताऱ्यासह ४,२१,१११ क्विंटल साखर उत्पादीत केली कारखान्याचे आसवाणी प्रकल्पही सुरु आहे यामध्ये ४९२४५०१ लिटर इथेनॉल उत्पादन व तसेच कारखान्याच्या सहविज निर्मिती प्रकल्पातुन ८४४८००० युनिटचे महावितरणा एक्सपोर्ट झाले असल्याची माहीती कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर देशमुख यांनी दिली.

सदरील कार्यक्रमास लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन श्री. प्रमोद जाधव , कारखान्याचे माजी चेअरमन तथा संचालक यशवंतराव पाटील, साखर संघाचे मा.उपाध्यक्ष तथा संचालक आबासाहेब पाटील, धनराज देशमुख, संग्राम माटेकर, तुकाराम कोल्हे, तानाजी कांबळे, शंकरराव पाटील, गोविंद पाटील, रणजित पाटील, ,बालाजी हाके, श्री व सौ. वैशालीताई पंडीतराव माने, श्री व सौ. आमृताताई स्नेहलराव देशमुख, तज्ञ संचालक चंद्रचुड चव्हाण, नरसिंग इंगळे, कार्यलक्षी संचालक आण्णासाहेब पाटील, कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे शेतकरी सभासद व कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# संभाजी महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्यावर व्याख्यान संपन्न



मुरुड /महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात दि. ९ फेब्रुवारी रोजी थोर समाजसुधारक आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन व कार्यावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अकोला जिल्ह्यातील अकोट येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. सौदागर सतीश भिसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम होते. प्रमुख उपस्थिती श्री. शिवाजी महाविद्यालय अकोटचे प्राचार्य डॉ.सुनील पांडे यांची लाभली.आपल्या व्याख्यानात प्रा. सौदागर भिसे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेतला. ते म्हणाले की, भाऊसाहेबांनी बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाची गंगा पोहोचवली. शेती आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य अजोड असून, त्यांचे विचार आजच्या तरुणाईसाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन आपल्या आयुष्यात यशस्वी वाटचाल करावी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अरुण कानडे यांनी अत्यंत बहारदार पद्धतीने केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. विकास शेळके यांनी मानले. या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांची ब्लॉकचेन क्युआरकोड अंकित पदवी प्रमाणपत्राची डिजिटल प्रत उपलब्ध



नाशिक (प्रतिनिधी) : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना, महत्वाचे संदेश व पुढील परीक्षेसंदर्भातील आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांना त्या-त्या वेळी ईमेल व मोबाईलवर प्राप्त होण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या डिजिटल पोर्टलवर (र्हीींिं://ूर्लोी.वळसळींरश्रीपर्ळींशीीळीूं.रल) लॉगीन करून स्वत:च्या प्रोफाईल मधील वैयक्तिक माहिती तपासून अद्ययावत करावी. त्यात प्रामुख्याने स्वत:चा ईमेल आयडी व मोबाइल क्रमांकाची नोंद अचूक असणे अत्यावश्यक आहे, असे आवाहन मुक्त विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व मा. प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठाच्या उत्तीर्ण झालेल्या १ लाख २३ हजार ९८४ विद्यार्थ्यांचे ब्लॉकचेन क्युआरकोड अंकित पदवी प्रमाणपत्र तयार करण्यात आले. त्यापैकी १ लाख ०३ हजार ६४० विद्यार्थ्यांना ईमेलद्वारे पीडीएफ स्वरूपातील प्रमाणपत्र यशस्वीरित्या पाठविण्यात आले. परंतु २० हजार ३४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेच्या वेळी ईमेल चुकीचे नोंदविल्यामुळे त्यांचे पदवी प्रमाणपत्र पाठविले गेलेले नाही. मात्र सर्वच पदवी प्रमाणपत्रे हे ई-सुविधा मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांचे डीजीटायजेशन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने उचललेले हे प्रशासकीय व प्रशंसनीय पाऊल आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित क्यूआरकोड असलेल्या या प्रमाणपत्राची सुरक्षितता पूर्णपणे सुनिश्चित करण्यात आली आहे. कोणत्याही प्रमाणपत्रावरील मजकुरात बदल होऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांकडे डिजिटल प्रत कायमस्वरूपी उपलब्ध राहणार असल्यामुळे मुलाखतीसाठी मूळ प्रत बाळगण्याची गरज राहणार नाही. ही प्रक्रिया पूर्णपणे कागदविरहीत असून नियोक्ते व विविध संस्थांना संबंधित पदवी प्रमाणपत्र काही सेकंदांत ऑनलाइन तपासता येणार आहे. त्यामुळे पडताळणी मानवी हस्तक्षेपाविना अधिक जलद व सुलभ पद्धतीने पार पडणार आहे. विद्यापीठातर्फे गेल्या वर्षीच्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना पदवी प्रमापत्रावर ब्लॉकचेन क्युआरकोड अंकित करून त्याचे वितरण करण्यात येत आहे. ई-सुविधा मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या पदवी प्रमाणपत्राचा उपयोग पुढील शैक्षणिक कामकाजासाठी विद्यार्थ्यांनी करावा असे आवाहन परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

# वंदे मातरम् ला राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे : पार्थ बावस्कर





लातूर : रवींद्रनाथ टागोर यांनी जन – गण – मन ऐवजी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांची रचना असलेल्या वंदे मातरम् ला राष्ट्रगीत करा असे म्हटले होते. रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा प्रवास राहिलेल्या वंदे मातरम् ला आता राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे, असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला २०२६ चे तृतीय पुष्प शुक्रवारी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी ' वंदे मातरम् – राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन ' या विषयावर गुंफले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे चे कुलसचिव डॉ. अमित शेष हे उपस्थित होते. मंचावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, सौ. प्राजक्ता सरदेशमुख, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्राचार्य डॉ. रवींद्र शेंडगे,सुधीर धुतेकर, एस.डी. कुलकर्णी यांची उपस्थिती होती. उपस्थितांना अगदी मंत्रमुग्ध करताना पार्थ बावस्कर यांनी वंदे मातरम् या गीताच्या निर्मितीची पार्श्र्वभूमी सविस्तरपणे विशद केली. वंदे मातरम् या राष्ट्रगीताने अनेक राष्ट्रभक्त निर्माण केल्याचे सांगताना त्यांनी वासुदेव बळवंत फडके, चंद्रशेखर आझाद, मदनलाल धिंग्रा, सूर्यसेन, अल्लुरी राजू, कनकलता बहुआ, मातंगिनी हजरा , तुळेश्र्वरी देवी अशा अनेक क्रांतिवीरांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वंदे मातरम् साठी प्राणांचे बलिदान दिल्याची माहिती पार्थ बावस्कर यांनी अनेक क्रांतिकारकांची उदाहरणे देऊन दिली.

वंदे मातरम् या शब्दाने ब्रिटिशांना अक्षरही सळो की पळो करून सोडले होते. वंदे मातरम् ला ब्रिटिशांनी भारतीयांच्या मनातून काढण्याचा प्रयत्न केल. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. वंदे मातरम् ची विद्यार्थी दशेतच प्रेरणा मिळाल्याने रा. स्व. संघाचे आद्य संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांच्यासारखे राष्ट्रप्रेमी युगपुरुष या भारतमातेला मिळाले. त्याकाळी ब्रिटिशांना आवरण्याचा मोठा लढा बंगालमधील संतांनी दिला होता, याचे स्मरणही त्यांनी करून दिले. वासुदेव बळवंत फडके यांनी स्वतःला राष्ट्र कार्यात झोकून देण्यामागची वास्तवताही बावस्कर यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली. रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण वंदे मातरम् जाहीरपणे गायले होते,असेही त्यांनी सांगितले. वंदे मातरम् चा जयघोष करत असंख्य राष्ट्रभक्तांनी मृत्यूला कवटाळल्याचे सांगताना पार्थ बावस्कर यांचा कंठ भरून आला.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी वंदे मातरम् ला राष्ट्रगीत म्हणून मान्यता दिली नव्हती. आता त्याच क्रांतिकारी गीताचा प्रवास रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा सुरु झाल्याचे त्यांनी गौरवाने नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. गोळवलकर गुरुजींच्या अतुलनीय कार्याची माहिती विशद करताना त्यांनी गुरुजी ज्या भागात प्रवास करत असत एकाच भाषेत बौद्धिक देत असल्याचे सांगताना गुरुजींना कधीही भाषेची चणचण जाणवली नसल्याचे नमूद केले. वंदे मातरम् ला त्याकाळी क्रांतिकारकांचा रक्तयज्ञ असेही संबोधले जात असल्याचे सरदेशमुख यांनी सांगितले.

प्रा. शरद पाडे यांनी वंदे मातरम् गौरव गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन प्रल्हाद माले , राजश्री कुलकर्णी यांनी केले. डॉ. वृषाली देशमुख यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# राजकारणात असूनही प्राणी -पक्ष्याबद्दल प्रेम असणारे चिवडे पाटील यांनी पुन्हा वाचवले हरीनाचे प्राण

लातूर – लातूर तालुक्यातील गंगापूर येथील भाजप कामगार मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष ज्योतीराम चिवडे पाटील हे राजकारणात राहूनही मनाने हळवे असणारे नेतृत्व. प्राणी पक्षी कधीही अडचणीत आले, संकटात सापडले की त्यांच्या मदतीला पहिल्यांदा धावून जाणारे..आज. १४ एप्रिल वॅलेंटाईन डे दिवशी एक घटना घडली. गंगापूर शिवारात काही मोकाट कुत्र्याने एका कळविटास जखमी केल्याची गंगापूर येथील बिपीन कटारे या शेतकऱ्याने यांनी चिवडेपाटील यांना दिली. चिवडे पाटील यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांचे शेत गाठले आणि जखमी हरीनावर प्रथमोपचार करून वनविभागाचे वनक्षेत्र अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक पवार यांना माहिती दिली. त्यांनी कांबळे यांना जीप्सी घेऊन पाठवली. त्यांनी जखमी हरिणास पुढील उपचारासाठी घेऊन गेले.आणि त्या हरीनाचे प्राण वाचले. यावेळी चिवडे पाटील यांच्यासह शेतकरी बिपीन साळुंके, सगर कटारे, धीरज कटारे, बालाजी साळुंके, सुभाष साळुंके, शिवाजी साळुंके, विरेश केळेयांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. आतापर्यंत चिवडे पाटील यांनी शेकडो वन्यप्राण्यांचे जीव वाचवले आहे त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. त्यांची वन्यप्राणीनिमित्र म्हणून ओळख निर्माण झाली आहे. जनसेवा हीच ईश्र्वर सेवा मानून वन्यप्राण्याची सेवा करतो.. तसेच गोरगरीब, पडीत, अडचणीत असलेल्या माणसाच्या मदतीला धावून जातो.. असे चिवडे पाटील यांनी सांगितले.



हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.